# प्रेस नोट

दिनांक ०३/०२/२०२१

## माणिकपुर पोलीस स्टेशन येथील पोलीस कर्मचाऱ्यांना लाच स्विकारल्याप्रकरणी शिक्षा

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | **ठाणे** |
| गुन्हा नोंद क्रमांक | माणिकपूर पोलीस स्टेशन, गुन्हा नोंद क्रमांक ।। १८/२००९, |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा सन १९८८ चे कलम ७,१२,१३(१)(ड) सह १३(२) |
| आरोपीचे नाव व कार्यालय | **१) संजय उत्तमराव देशमुख, पोलीस नाईक/२५२४,**<br>**२) बाबासाहेब विष्णु बोरकर, पोलीस नाईक/१७५०, माणिकपूर पोलीस स्टेशन, ठाणे ग्रामीण.** |
| मागितलेली लाचेची रक्कम | ४,०००/— रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ४,०००/— रुपये |
| थोडक्यात हकिकत | यातील तक्रारदार यांना त्यांच्या गाडीच्या अपघाताची नोंद घेऊन गाडीची कागदपत्रे व पंचनाम्याची प्रत देण्यासाठी वरील नमुद आरोपींना तक्रारदार यांच्याकडुन ४,०००/—रुपयांची लाच स्विकारताना रंगेहात पकडुन, त्यांच्याविरूध्द माणिकपूर पोलीस स्टेशन येथे दिनांक ०३/०६/२००९ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.<br>गुन्हयाचा तपास पुर्ण करून जिल्हा व सत्र न्यायालय, वसई येथे नमुद आरोपीविरूध्द दोषारोप पत्र दाखल करण्यात आले होते.<br>सदर गुन्हयाची सुनावणी माननीय विशेष न्यायाधीश, श्री. सुधीर एम. देशपांडे, जिल्हा व सत्र न्यायालय, वसई येथे झाली असता, सुनावणीअंती नमुद आरोपीविरूध्द सबळ पुराव्यानिशी आरोप सिध्द झाल्याने दिनांक ०३/०२/२०२१ रोजी खालीलप्रमाणे शिक्षा सुनावली आहे.<br>आरोपी क्र. १ यांना भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम १२, १३(१) (ड) सह १३(२) प्रमाणे ४ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व ५,०००/—रुपये(पाच हजार) दंड तसेच दंड न भरल्यास १ महिने साधी कारावासाची शिक्षा.<br>आरोपी क्र. २ यांना भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे ४ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व १०,०००/—रुपये(दहा हजार) दंड तसेच दंड न भरल्यास १ महिने साधी कारावासाची शिक्षा.<br>सदर गुन्हयाचा तपास तत्कालीन पोलीस निरीक्षक, श्री. विसपुते, अे.सी.बी., ठाणे यांनी केला असुन, सरकारी अभियोक्ता म्हणुन श्री. जयप्रकाश पाटील यांनी काम पाहीले. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

---


संपर्क पत्ता :— ला.प्र.वि.ठाणे मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम ४००६०१

संकेतस्थळ :— acbmaharashtra@mahapolice.gov.in

ई—मेल :— spacbthane@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :— acbmaharashtra.net

टोल फ्री नं :— १०६४

दुरध्वनी क्र. :— ०२२—२०८१३५९८/२०८१३५९३

व्हॉटस ॲप क्र. :— ९९३०९९७७००


पोलीस उप अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे.

(मदन बल्लाळ)
**पोलीस उप अधीक्षक**
**ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे.**